# नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०२४
# अभिमन्यु दत्तात्रय वाडकर व इतर वि. शंकर गोपाल वाडकर व इतर
# निशाणी क्र. ५ व २३ वरील आदेश
# (दि. १८/११/२०२४ रोजी पारित )

०१. वादी यांनी मुळ दावा, वाटप, ताबा, ठराव व निरंतर ताकीदासाठी प्रतिवादी क्र.१ ते ७ विरुध्द दाखल केला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी क्र.१, २ व ४ हजर झाले आहेत. त्यांनी दाव्यास कैफियत/जबाब व प्रतिदावा या वादीविरुध्द ठराव, निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. मुळ दाव्यात वादीने सर्व प्रतिवादीं विरुध्द तुर्त मनाई अर्ज नि.५ वर दाखल केला आहे तर प्रतिदाव्यात प्रतिवादीने या वादीविरुध्द नि.२३ वर तुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे. ज्यावर वादीने म्हणणे दाखल केले नाही. मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१, २ व ४ वगळता इतर प्रतिवादींना दाव्यात हजर करण्याकामी वादीने पावले उचलली नाहीत. सबब, त्या प्रतिवादींवर दाव्याची समन्स बजावणी नसल्याने प्रस्तुत नि.५ चा अर्ज त्याविषयी लागू नाही. वादी व प्रतिवादी क्र.१, २,व ४ यांचे तुर्त मनाई अर्ज नि.५ व नि.२३ दावा मिळकत संदर्भाने असल्याने ते एकत्रात विचारात घेतले आहेत.

## नि.५

०२. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केला असुन सदर अर्जात दावा मिळकतीचे वाटप होवून कब्जा मिळेपर्यंत प्रतिवादीने दावा मिळकतीचे नुकसान होईल, मिळकतीवर बोजा निर्माण होईल, मिळकतीतील वादींच्या सामाईक हक्क, अधिकारास अडथळा येईल, मिळकतीच्या स्वरुपात कोणताही बदल होईल असे कोणत्याही स्वरुपाचे कृत्ये आणि अथवा बांधकाम करु अथवा करवु नये असा प्रतिवादींसाठी तात्पुरता मनाई हुकूम पारित व्हावा अशी मागणी केली आहे.

## नि.२३

**०३.** प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केला असुन सदर अर्जात प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत तिऱ्हाईत इसमास विकू नये अगर तबदील करु नये तसेच दावा मिळकतीवर कोणत्याही प्रकारे बांधकाम करु नये. प्रतिवादींच्या शांततापूर्वक ताब्यास हस्तकांकरवी हिल्ला हरकत करु नये असा वादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम पारित व्हावा अशी मागणी केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

**०४.** तुकडी– पुणे पोट– तुकडी तालुका – भोर मा.दुय्यम निबंधक यांचे हद्दतील तसेच जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती भोर, ग्रामपंचायत गाव मौजे ससेवाडी येथील मिळकत.

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ (ए) | २५५ | एकूण क्षेत्र ०० हे.३७.०० आर. चतुःसिमा पुढील प्रमाणे – पूर्वेस – गट क्र. २५७ ची मिळकत, दक्षिणेस–गट क्र.२६६, पश्चिमेस–२५४, उत्तरेस – गट क्र.२५६ | ०० रु. २२पैसे |
| २ (ब) | २९२ | एकूण क्षेत्र ०० हे.१४.०० आर. चतुःसिमा पुढील प्रमाणे – पूर्वेस – गट क्र. २९१, दक्षिणेस – गट क्र.२९९,पश्चिमेस–३००, उत्तरेस – रस्ता मिळकत | ०० रु. ३७पैसे |
| ३(स) | ४०१ | ०५ हे.०५ आर. अधिक पो.ख.०हे.७३ आर एकूण क्षेत्र ५ | ०० रु. ८१पैसे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | हे. ७८ आर.<br>चतुःसिमा पुढील प्रमाणे – पूर्वेस – मौजे शिंदेवाडी गावची शिव, दक्षिणेस–गट क्र.४०१ आणि ४०२ पश्चिमेस– ३९९ व गट क्र.४००, उत्तरेस – गट क्र.३८० | |
| ४(डी) | ४०२ | क्षेत्र २ हे. ३३.१४ आर<br>चतुःसिमा पुढील प्रमाणे – पूर्वेस –गट क्र.४०६ व ४०७, दक्षिणेस–गट क्र.४०५ पश्चिमेस– ४००, उत्तरेस – गट क्र.४०१ | ० रु. ५६ पैसे |
| ५(ई) | ४१६ | क्षेत्र ० हे. ४७.१० आर अधिक पो.ख.० हे.१४ आर एकूण क्षेत्र ० हे.६१.१० आर | ०रु. ८७ पैसे |
| ६ (एफ) | ४२५ | क्षेत्र ० हे. ६७.५० आर अधिक पो.ख.० हे. १४.६० आर एकूण क्षेत्र ० हे. ८२.१० आर पूर्वेस – गट क्र.४२८ व ससेवाडी गावची बालवाडी, दक्षिणेस– याच गटातील उर्वरित क्षेत्रातील बालवाडी वर्ग, पश्चिमेस– याच गटातील उर्वरित क्षेत्र, उत्तरेस – गट क्र.४१६ | १रु.९७ पैसे |
| ७ (जी) | २६८ | एकूण क्षेत्र८ हे.१३ आर यापैकी क्षेत्र ० हे. ४८.२७ आर. पुर्वेस – | ०रु २२ पैसे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गट क्र. २५४, दक्षिणेस – गट क्र.२६९, पश्चिमेस गट क्र.२६९, उत्तरेस– गट क्र. २७३ | |

येणेप्रमाणे चतुःसिमा पूर्वक मिळकत त्यातील दगड–माती, झाडा–झाडोरा, जल–तरु, तृण, काष्ट–पाषाण, निधी–निक्षेप इ. तद्ंगभूत वस्तुसहीत तसेच मालकी, वहिवाटीच्या आणि मिळकतीत येण्याजाण्याच्या रस्त्याचे हक्कासह व इजमेंटच्या वगैरे सर्व हक्कासहित दरोबस्त मिळकती या दाव्याचा विषय आहे.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**नि.५ च्या अर्जाकरिता वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

**०५.** दावा मिळकती वादी व प्रतिवादीचे एकत्र हिंदू कुटुंबाचे पुर्वाधिकारी, मूळ पुरुष कै. गोंविद साधू वाडकर यांचे मालकी ताबे वहिवाटीच्या आहेत. कै. गोंविद यांना गोपाळा आणि दत्तात्रय असे दोन मुलगे होते ते दोघेही मयत आहेत. त्यापैकी कै. गोपाळ वाडकर यास घनश्याम, कृष्णा, अर्जुन, शंकर असे चार मुलगे आणि ताराबाई, इंदिरा आणि अरुणा या तीन मुलौ पैकी घनश्याम मयत असून त्यास पत्नी सरिता, मुलगा प्रशांत आणि प्रमिला व साधना या दोन मुली असे कायदेशीर वारस आहेत. तसेच कृष्णा हा देखील मयत असून त्यास प्रल्हाद आणि यशंवत अशी दोन मुले कायदेशीर वारस आहेत. तसेच अर्जुन हा देखील मयत असून त्यास शंकुतला पत्नी, संजय मुलगा, कल्पना, मंगल व स्वाती अशा तीन मुली कायदेशीर वारस आहेत. शिवाजी हा शंकर यांचा मुलगा आहे. तसेच मुळ पुरुष गोविंद यांचा दुसरा मुलगा दत्तात्रय हा देखील मयत असून त्यास अभिमन्यू व दिलीप ही दोन मुले म्हणजेच वादी हे कायदेशीर वारस आहेत.

**०६.** वादी हे जन्मापासून गाव मौजे भिवरी, ता. पुरंदर येथे कामानिमित्त राहण्यास आहेत. प्रस्तुत मिळकती या वादीच्या एकत्रीत हिंदू कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मालकी ताबे वहिवाटीच्या आहेत. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी क्र. १ व ५ स्वतः आणि प्रतिवादी क्र. ६ ते. ९ यांचे पुर्वाधिकारी कै. घन:शाम आणि प्रतिवादी क्र. २

व ३ यांचे पुर्वधिकारी कै. कृष्णा यांनी बेकायदेशीर संगनमत करून वादीपासून काही मिळकती म्हणजेच गट नं. २६८ ची मिळकत जाणून–बुजून अंधारात ठेऊन/लपवून ठेवून वादीची फसवणूक केली. त्यांना मिळणाऱ्या वडिलोपार्जित कायदेशीर हिश्यापेक्षा एकदम कमी क्षेत्र देऊन, क्षेत्रात देखील फसवणूक करून तथाकथित रजि. दस्त क्र. ९२९/२००५ चे बेकायदेशीर वाटणीपत्र लिहून व नोंदवून अस्तित्वात आणले. वादीची फसवणूक केल्यामुळे ते पुर्णत: बेकायदेशीर आणि मिळकतीस गैरलागू आहे.

०७. सदरील वाटणीपत्रात ७/१२ वरील वादी– प्रतिवादीच्या कुटुबांतील सर्व आवश्यक त्या सहहिस्सेदारास पक्षकार म्हणून जाणूनबुजून प्रतिवादीने सामिल केलेले नाही. सदरील गट नंबर २६८ यातील वादी– प्रतिवादीच्या वडिलोपार्जीत मालकी ताबे वहिवाटीचे क्षेत्र ० हे. ४८.२७ आर यासी आकार ० रूपये २२ पैसे ही संपूर्ण मिळकत प्रतिवादी क्र. १ व ५ आणि प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचे पूर्वधिकारी कै. घनःशाम आणि प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे पुर्वधिकारी कै. कृष्णा यांनी वादींपासून लपवून ठेऊन, सदरील मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ३, ५, ६, ८ आणि १३ यांनी दि. २४/४/२०१५ रोजीच्या नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. १५९६/२०१५ अन्वये वादींचे परस्पर प्रतिवादी क्र. १७ यास रक्कम रुपये २१,६०,०००/– इतक्या रक्कमेस विक्री करून बेकायदेशीर पैका केलेला आहे. सदरील दस्त हा वादीच्या हिश्यावर कधीही बंधनकारक नाही. सबब वादीने तसा ठराव करून मिळणेसाठी सदरील दावा या कोर्टात दाखल केलेला आहे.

०८. सदरील वाटपपत्राच्या दस्तावरून धरण्यात आलेला फेरफार क्र. ४२६ हा या प्रतिवादी यांनी रद्द करून घेतला व वादीची फसवणूक या प्रतिवादींनी केलेली आहे. ते वाटपपत्र वादीच्या हिश्श्यावर कधीही बंधनकारक नव्हते सबब, वादीस हा प्रस्तुत दावा या कोर्टात दाखल करणे भाग झालेले आहे. तरीही केवळ ७/१२ सदरी नावे दाखल व्हावीत म्हणून वादीने सदरील फेरफार विरुद्ध उपविभागीय अधिकारी, भोर यांचे कार्यालयात सदरील फेरफार मंजूर करण्यात यावा म्हणून अपील दाखल केले

आहे. आज रोजी दावा मिळकत वादीच्या नावाची नोंद सन २०२३ नंतर महसुली खात्याच्या आदेशाने झाली आहे.

**०९.** वादीने सन २०२२ मध्ये सदरील फेरफार क्र. ४२६ बाबत अपील दाखल केले. त्यानंतर सदरील मिळकती संदर्भातील सर्व फेरफार व कागदपत्रे काढणेकामी वादी भोर येथील दुय्यम निबंधक व अभिलेख कार्यालयात गेले असता, वादी क्र. १ यास सदरील २०१५ च्या खरेदी दस्ताबाबत व प्रतिवादीने वादींची फसवणूक केल्याबाबत वादीस माहिती झाली तेव्हा या दाव्यास कारण घडले. त्यांनतर सन २०२३ च्या डिसेंबर महिन्यात प्रतिवादी क्र. ४ यांनी गट नं. ४२५ च्या मिळकतीत, वादीस कोणतीही पूर्व कल्पना न देता, सदरील मिळकतीत वादीस वाटपाने दिलेल्या क्षेत्रात बेकायदेशीर घराचे बांधकामास सुरुवात केली सबब सदरील दावा कोर्टात चालू असे पर्यंत त्यांनी सदरील मिळकतीत कोणत्याही स्वरूपाचे बेकायदेशीर बांधकाम करू नये म्हणून तशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी म्हणूनही वादीने प्रस्तुत अर्ज कोर्टात दाखल केलेला आहे.

**१०.** तसेच प्रस्तुत गट नं. ४२५ मधील मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री करणे कामी या दाव्यातील प्रतिवादी क्र. १, ४ व ५ हे नवीन खरेदी घेणारास मिळकतीत आणून सदरील मिळकत त्यांना विक्री करीता दाखवित आहे. ते मिळकत विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. सदरील मिळकत बेकायदेशीर विक्री करू नये म्हणूनही प्रस्तुत दावा वादीने कोर्टात दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी १, ४ ते ५ हे आडदांड वृतीचे असून राजकिय वर्तुळात असलेल्या ओळखीचा गैरफायदा घेऊन मिळकतीत बेकायदेशीर बांधकाम करण्यास तसेच सदरील मिळकतींची बेकायदेशीर विक्री करण्यास ते बिलकूल मागे पुढे पाहणार नाहीत.

**११.** सबब वादीने प्रस्तुत दावा चालू असताना दरम्यानचे काळात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी स्वतः अगर त्यांचे नोकर, चाकर, एंजट अगर त्यांचे वतीने इतर कोणीही

त्रयस्त इसमाने कोणत्याही प्रकारे बेकायदेशीरपणे दाव्यातील वाद मिळकतीत बेकायदेशीर बांधकाम करू नये अगर मिळकती त्रयस्तास विक्री करू नयेत म्हणून तर्तातुर्त मनाई मिळणे कामी वादी अलहीदा अर्ज देत आहेत.

**१२.** सदरील दाव्याचा निकाल वादीचे पक्षात होईल यांची पुर्ण खात्री व भरोसा या वादीस आहे. तसेच न्यायचा तराजू, दाव्याचा समतोल वादीचे बाजूने, वादीच्याच पक्षात आहे. वादीस प्रथम दर्शनी केस आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी तुर्तातुर्त मनाई न मिळल्यास, प्रतिवादी क्र. १, ४ आणि ५ हे इतर प्रतिवादींचे मदतीने बेकायदेशीर मिळकतीची विक्री त्रयस्त इसमास करील, मिळकतीच्या मूळ स्वरूपात बदल करतील आणि त्यामुळे वादीचे पैश्याच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मिळकतीवर तिऱ्हाईत बोजा निर्माण होईल, मिळकतीतील वादीच्या सामाईक हक्क, अधिकारास बाध/अडथळा येईल मिळकतीच्या स्वरुपात कोणताही बदल होईल असे कोणतेही कृत्ये करु नये अथवा करवू नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्याची विनंती या अर्जाद्वारे केली आहे.

**<u>प्रतिवादीचे नि.५ च्या अर्जास जबाब/म्हणणे पुढीलप्रमाणे</u> –**

**१३.** प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांचेतर्फे यांनी नि.क्रं ५ चे मनाई अर्जास जबाब **नि. २१** दाखल आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, दावा मिळकत गट क्र.२५५ च्या दक्षिणेस गट नं. २६६ नसून गट नं. २५४ आणि २५६ या मिळकती आहेत. तर उत्तरेस गट क्र. २५६ सह २५२ आणि २४९ या दोन मिळकती आहेत. दावा मिळकत गट क्र.२९२ च्या पुर्वेस गट क्र. २९१ सह गट क्र. २९३ सुध्दा आहे, उत्तरेस रस्ता नसून गट नं. ३०० आणि २९० या मिळकती आहेत. दावा मिळकत गट क्र.४०१ च्या पुर्वेस शिंदेवाडी गावच्या शिवेसह गट क्र. ४०२ ही मिळकत आहे. दक्षिणेस गट नं. ४०१ याच दावा मिळकतीचे क्षेत्र असेल तर गट नं. ४०२ ही मिळकत येऊच शकत नाही. गट क्र. ४०० ही मिळकत आहे. तर उत्तरेस गट नं. ३८० सह शिंदेवाडी गावची शिव सुध्दा आहे.

**१४.** दावा मिळकत गट क्र.४०२ च्या मिळकतीचे वर्णन करताना यापैकी वादीच्या मालकी ताबे वहिवाटीचे क्षेत्र २ हे. ३३.१४ आर क्षेत्र असे नमूद केलेले आहे, परंतू या मिळकतीच्या कोणत्याही दिशेस उर्वरीत क्षेत्र नमूद केलेले नाही. पुर्वेस गट नं. ४०६ सह गट नं. ४०७. ४१० आणि ४३० ह्याही मिळकती आहेत. दक्षिणेस गट क्र. ४०५ सह ४०६, ४०७ आणि ४१० ह्याही मिळकती आहेत. पश्चिमेस गट क्र. ४०० सह गट क्र. ४०५ हीही मिळकत आहे. उत्तरेस गट नं. ४०१ सह शिंदेवाडी गावची शिवसुध्दा आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन करताना यापैकी मिळकतीचे वर्णन केलेले आहे. दावा मिळकत गट क्र.४१६ च्या पुर्वेस गट क्र. ४३० नमून ४२९ ही मिळकत आहे. तर उत्तरेस गट नं. ४१५ नसून गट नं. ४२२, ४२३, ४२४, ४२६ आणि ४२८ ह्याही मिळकती आहेत.

**१५.** दावा मिळकत गट क्र. ४२५ च्या पुर्वेस गट नं. ४२८ ही मिळकत नसून गट क्र. ४२९ ही मिळकत आहे. त्याचप्रमाणे ससेवाडी गावची बालवाडी नाही. दक्षिणेस याच गटातील बालवाडी वर्ग नसून रस्ता आहे. या मिळकतीचे वर्णन करताना संपुर्ण क्षेत्र असे नमूद केलेले आहे. मात्र पश्चिमेस याच गटातील उर्वरीत मिळकत असे नमूद केलेले आहे. उत्तरेस गट नं. ४१६ नसून गट क्र. ४२२, ४२३, ४२४, ४२६, आणि ४२८ या मिळकती आहेत. दावा मिळकत गट क्र.२६८ मिळकतीचे वर्णन करताना यापैकी वादी व प्रतिवादी यांचे ताबे नमूद केलेले वहिवाटीचे क्षेत्र हे. ४८.२७ आर मिळकत असे मिळकतीचे वर्णन आहे. मात्र या मिळकतीच्या कोणत्याही बाजूस उर्वरीत क्षेत्र नमूद नाही.

**१६.** या मिळकतीच्या पुर्वेस गट क्र. २५४ स गट क्र. २५३ आणि इतरही मिळकती आहेत. पश्चिमेस गट क्र. २५९ ही मिळकत नमूद २७० ही मिळकत आहे. उत्तरेस गट क्र. २७३ ही मिळकत नसून गट क्र. २७०, २७६, २५४, आणि २६७ या मिळकती आहेत. शिवाय सदर मिळकत या प्रतिवादींच्या मालकी व ताबेवहिवाटीची कधीही नाही. या मिळकतींच्या निश्चित आणि बरोबर चतु:सिमा दाखविण्यासाठी सदर

प्रतिवादी हे या कैफियतीसोबत वेगळ्या यादीद्वारे अ.क्र. १ ते १२ वर दावा मिळकतींचे उपअधीक्षक भुमी भोर यांच्याकडील गट नकाशाच्या सहिसूद प्रती आणि अभिलेख Mahabhumi या संकेतस्थळावरून काढलेले नकाशाचे अहवाल दाखल केलेले आहेत. अशा चुकीच्या आणि पोकळीस्त वर्णनाच्या मिळकतींबाबत वादींचा दावा कायद्याच्या चौकटीतला नसून तो फेटाळण्यास पात्र आहे.

**१७.** गोविंद साधू वाडकर यांना एकमेव मुलगा नामे गोपाळा आणि मुलगी नामे सावित्राबाई विष्णू अवसरे ही होती. गोपाळा मयत झाल्यानंतर त्यांचे या शाखेत नमूद केल्याप्रमाणे वारसदार आहेत. गोविंद यांस दत्तात्रय नावाचा अगर कोणत्याही नावाचा दुसरा मुलगा नव्हताच त्यामुळे गोविंद वाडकर यांची दत्तात्रयबाबत वंशावळ सदर प्रतिवादी नाकारीत आहे. प्रतिवादींनी या वादींना गाव मौजे ससेवाडी येथे कधी आल्याचे पाहिलेही नाही. अगर कोणत्याही मिळकतीवर वादी यांचा ताबाही नाही. प्रतिवादी हे गोविंद यांचे मयत वारसदार म्हणून गोपाळा यांचा एकमेव मुलगा या नात्याने आणि त्यांच्या मृत्यूपश्चात वारसदार म्हणून त्यांचे मुले–मुली व पुढे नातू म्हणजेच प्रतिवादी यांची वारस नोंद झालेली आहे.

**१८.** या कोणत्याही वारस नोंदीस वादी यांनी कोणत्याही न्यायालयात हरकत अगर आव्हानित केलेली नाही. ते आजही विनाआव्हानित आणि कायम आहे. यावरूनही वादी यांचा कधीही संबंध नव्हता अगर नाही, हेच सिध्द होते. सबब वादी यांना सदर दावा दाखल करण्याचे उपस्थिती अधिकार नाहीत. वस्तुतः दावा मिळकतीपैकी मुळची स. क्र. ३७/१, गटवारीचा नंतरचा गट क्र. २५५ त्याचप्रमाणे स. क्र. ६८/२ गटवारीचा नंतरचा गट क्र. ४०२ , गट क्र. २९२ या मिळकती के. गोपाळा वाडकर यांना रखमाबाई वाडकर हिने दिनांक ७ सप्टेंबर १९६४ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्र क्र. ८७२/१९६४ अन्वये दिलेल्या आहेत. त्यामुळे वादाकरीता जर काही वादीच्या वडिलांचा अधिकार निघाल्यास वादींचा या मिळकतींशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही.

**१९.** सदर बक्षिसपत्र सदर प्रतिवादी हे वेगळ्या यादीद्वारे अनुक्रमांक १३ वर दाखल करीत आहे. स. क्र. ३७/१ च्या ऐवजी स. क्र. ३७/२ वर रखमाबाई वाडकर हिचा कब्जा आढळल्याने स. क्र. ३७/१ च्या ऐवजी स. क्र. ३७/२ च्या मिळकतीवर फेरफार क्र. ६०८ ने रखमाबाई वाडकर हिच्या नावाची नोंद झाली. त्यामुळे बक्षिसपत्राने स. क्र. ३७/१ च्या ऐवजी ३७/२ ला पुढे गोपाळा वाडकर यांच्या नावाची नोंद झालेली होती. सदर फेरफार क्र. ६०८ सदर प्रतिवादी हे वेगळ्या यादीद्वारे अनुक्रमांक १४ वर दाखल करीत आहे. सदर प्रतिवादी कथन करतात की, दावा परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केलेला मजकूर मान्य व कबूल नाही, असे दिसून येते की, वादीसह प्रतिवादी १, प्रतिवादी क्र. २ आणि ३ चे मयत वडिल नामे कृष्णा, प्रतिवादी क्र. ६ ते ९ चे मयत वडिल नामे घनश्याम, आणि प्रतिवादी क्र. ५ हे वाटपांस हजर होते. सदर वाटपपत्र हे वादी यांच्या दडपणाखाली आणि प्रभावाखाली करण्यात आलेले आहे.

**२०.** वादी यांनी खोट्याने, लबाडीने आणि विश्वासघात करून पोकळीस्त बनावट त्यांचे नावे कोणताही ७/१२ उतारा अस्तित्वात नसतानाही सदरचे वाटपपत्र करून घेतले आहे. या वाटपास कुणाचीही मुक्तसंमती नव्हती, त्याचप्रमाणे सदर वाटपपत्र हे दत्तात्रय हा गोविंद वाडकर याचा मुलगा होता असे भासवून, खोटेनाटे सांगून या प्रतिवादींची दिशाभूल करून वादींनी निष्पादीत आणि नोंदणी करून घेतलेले आहे. त्यामुळेच वादींनी त्यानंतर जवळजवळ १७ वर्षे या वाटपपत्रानुसार त्यांची नावाची नोंद ७/१२ दप्तरी होणेकामी प्रयत्न केलेला नव्हता अगर नाही. त्याचप्रमाणे वादी हे एकत्र कुटूंबातील नसल्याकारणानेच या वाटपपत्रात सर्व सहहिस्सेदार सहभागी नव्हते वा नाही. वादी यांचा दावा मिळकतीशी संबंध नसल्याकारणानेच त्यांनी कोणतीही त्यांचे नाव ७/१२ दप्तरी नोंदीसाठी हालचाल केलेली नाही, हेच सिध्द होत आहे. सदर प्रतिवादी पुढे असेही कथन करतात की, या परिच्छेदात नमूद केलेली मिळकत गट क्र. २६८ हे कधीही या प्रतिवादींच्या मालकीहक्काची नाही. तशी या मिळकतीच्या ७/१२ दप्तरी या प्रतिवादींची कधीही नोंद नाही.

२१. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, गट क्र. २६८ ची मिळकत कधीही या प्रतिवादींच्या मालकीहक्काची नव्हती. तशी या मिळकतीच्या ७/१२ दप्तरी या प्रतिवादींची कधीही नोंद नव्हती. खरेदीखत दाखल केलेले नाही, सदर मिळकत या प्रतिवादींच्या मालकीचीही नाही, आणि वादी व प्रतिवादींचा नातेसंबंधही नाही, त्यामुळे सदर मिळकत वडिलोपार्जित होती अगर ती लपवली अगर त्यापोटी मोबदला घेतला, याबाबत प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. वादीनेच या मिळकतीच्या दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यावरून असेच दिसून येते की, या प्रतिवादींचे नाव कोठेही आढळून येत नाही.

२२. प्रतिवादी पुढे कथन करतात की, कोणताही फेरफार मंजूर करणे अगर नामंजूर करणे हा त्या त्या अधिकाऱ्याचा अधिकाराचा भाग आहे. त्यामध्ये कोणत्याही पक्षकाराला हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे फेरफार रद्द झाला म्हणून वादीची फसवणूक होण्याचा प्रश्नच येत नाही. दावा दाखल करताना दावा मिळकतींच्या ७/१२ दप्तरी वादींची नावे नव्हती, त्यामुळेही सदरचा दावा दाखल करण्याचे अधिकारही वादींना प्राप्त होत नाहीत.

२३. प्रतिवादी कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ यांच्या हिश्शावर पुर्वीच गट क्र. ४२५ ही मिळकत आलेली आहे. त्या मिळकतीमध्ये या प्रतिवादींचे जुने सुमारे ५० वर्षापासून अधिक काळ दगड, वीट आणि सिमेंटचे घर होते. सदर घर मोडकळीस आलेले होते, व येत्या पावसाळ्यात भिंतीला तडे गेल्यामुळे पडण्याची शक्यताही होती. त्यामुळे या प्रतिवादींना ते पाडून त्या जागी नवीन घर बांधण्याशिवाय पर्यायही नव्हता. त्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाकडून रितसर परवानगीही घेतलेली आहे. या परवानगीस वादी यांनी हरकतही घेतलेली नाही. आज रोजी जुने घर पाडल्याने नवीन घर बांधणे अत्यंत निकडीचे झालेले आहे. शिवाय वादींना कोणतेही मालकीहक्क नसल्याने, जो पर्यंत त्यांचे मालकीहक्क सिध्द होत नाहीत, तो पर्यंततरी वादीला

कोणतीही मनाई मागता येणार नाही. त्यामुळे वादीचा दावा हाच मुळी पोकळीस्त आहे.

२४. प्रतिवादी यांचे असे म्हणणे की, गट क्र. ४२५ ही मिळकत ते विक्री करण्याबाबत कुठेही वाच्यता केली नाही अगर जाहीरही केलेले नाही. वादीचा दावा हाच मालकीहक्काविना दाखल केलेला असल्याने अगर ते दावा मिळकतीचे मालक आहेत, याचेही कथन न केल्याने वादीला दावा आणि मनाई अर्जही दाखल करता येत नाही. त्यामुळे वादीचा दावा अगर कोणतीही मनाई मंजूर करता येणार नाही.

२५. प्रतिवादी यांचे असे म्हणणे की, वादी हे दावा मिळकतीचे कधीही मालक नव्हते व नाहीत. वादी हे या प्रतिवादींचे कोणतेही नातेवाईक नाहीत. वादींची नावे कधीही दावा मिळकतींच्या कोणत्याही मालकीहक्क दाखविण्याऱ्या कागदपत्रांवर नमूद नाहीत. वादीच्या मालकीहक्कावर प्रश्नचिन्ह कायम होते व आहे. कोणताही मालकीहक्काचा पुरावा न देताच वादीने दावा दाखल केलेला आहे. वादीला कोणतेही मालकीहक्क नसल्याने वादीला कोणताही प्रथमदर्शनी दावा नाही. वादीने केवळ प्रथमदर्शनी दावा आहे, एवढेच कथन केलेले आहे. परंतू प्रथमदर्शनी दावा कसा आहे, याचे आवश्यक कथन केलेले नाही.

२६. वादीला प्रथम दर्शनी दावाच नसल्याने न्यायाचा तराजूही वादीच्या बाजूने नाही. प्रथम दर्शनी दावाच नसल्याने न्यायाचा तराजू हाही या प्रतिवादींच्याच बाजूने झुकलेला आहे. सदर प्रतिवादींची दावा मिळकती ह्या वडिलोपार्जित आहेत. वाडवडिलांपासून ते आजाखेर या प्रतिवादींची प्रत्यक्ष, शांततामय आणि कोणाच्याही हिल्लाहरकतीशिवाय कब्जेदार आणि ताबेवहिवाटदार असल्याने त्यांना या प्रतिवादींच्या कब्जातील मिळकतीवर हक्क वा अधिकार सांगता येणार नाही. त्यामुळे वादींपेक्षा या प्रतिवादींचेच अधिक कधीही भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब, या कारणास्तव, वादींचा मनाईचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

२७. प्रतिवादी हे वंशपंरपरेने मालक आहे. सदर प्रतिवादी वाडवडिलांपासून प्रत्यक्ष, शांततामय आणि कोणाच्याही हिल्ला हरकतीशिवाय कब्जेदार असल्याने वादींना या प्रतिवादींच्या कब्जातील मिळकतीवर हक्क वा अधिकार सांगता येणार नाही. त्यामुळे वादींपेक्षा या प्रतिवादींचेच अधिक कधीही भरून येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. १, ४ व ५ हे व इतर प्रतिवादींच्या मदतीने विक्री करतील ही एकमेव भिती असल्याचे कथन केलेले आहे. परंतू यास सबळ एकही वस्तुस्थिती दाखविणारा कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही.सबब, वादींचा मनाईचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

सदर प्रतिवादीने नि.२३ वर प्रतिदावा तुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे.

**<u>त्या अर्जामधील प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

२८. वादी यांना काहीही मालकी हक्क नसताना आणि त्यांच्या नावावर कोणतेही नोंद (जसे की ७/१२ उतारा) नसतानाही, तसेच त्यांचा प्रत्यक्ष ताबाही त्या मालमत्तेवर नसतानाही, त्यांनी केवळ आर्थिक स्वार्थ आणि अमाप नफा मिळवण्याच्या उद्देशाने व प्रतिवादींना फसविण्याच्या हेतूने दिनांक २४ मे २००५ रोजी एक वाटपपत्र तयार करून घेतले. हे वाटपपत्र वादींच्या हक्काविना आणि हेतूपुरते फसवणूक करून तयार केले गेले आहे. त्यामुळे हे वाटपपत्र रद्द होण्यास पात्र ठरते.

२९. दिनांक २४ मे २००५ रोजी वाटणीपत्र तयार करण्यात आले. त्यावेळी फक्त प्रतिवादी क्र. १ आणि ५ हे दोन सहहिस्सेदार उपस्थित होते. बाकीचे सर्व सहहिस्सेदार म्हणजेच प्रतिवादी क्र. २ ते ४ आणि ६ ते १६ हे या वेळी अनुपस्थित होते. त्यामुळे त्या दिवशी तयार केलेले आणि नोंदवलेले हे वाटणीपत्र सर्व सहहिस्सेदारांच्या संमतीशिवाय, बेकायदेशीरपणे व अनधिकृतपणे नोंदवले गेले आहे.

३०. प्रतिवादी क्र. २ ते ४ आणि ६ ते १६ हे तथाकथित वाटपपत्र तयार करताना उपस्थित होते, परंतु त्यावेळी त्यांच्या हाती ते वाटपपत्र नोंदवण्याचा अधिकृत

अधिकार नव्हता. तसेच वादींनी "वाडकर"आडनावाचा गैरफायदा घेतला आणि त्यांची फसवणूक करून, प्रामाणिकपणा न राखता हे वाटपपत्र नोंदवून घेतले. त्यामुळे हे वाटपपत्र रद्द करण्याजोगे आहे. तसेच, प्रतिवादींनी स्वतः दाखल केलेल्या कैफियतमध्ये म्हटल्याप्रमाणे, दावा मिळकतीत हक्क व अधिकार आहेत, असे ते मांडत आहेत.

३१. प्रतिवादी दावा मिळकत आजतागायत प्रत्यक्ष ताबेवहिवाटीत आहेत. वादी यांनी प्रतिवादींचा ताबा नसल्याचा गैरफायदा घेत, तसेच वाटपपत्रातील नमूद प्रतिवादीला धमकावून त्या वाटपपत्राची नोंदणी करून घेतली आहे. प्रतिवादी स्वतः या मिळकतीवर गवत कापणे, झाडे लावणे, लाकूड व दगड गोळा करणे, बांधबंदिस्त करणे अशा स्वरूपाची शेतीसंबंधी कामे करत आले आहेत. इतक्या काळात वादीने कधीही तक्रार केली नाही किंवा वाटपपत्राच्या आधारे प्रत्यक्ष ताबा मागितलेला नाही. प्रतिवादी हे गरीब शेतकरी कुटुंबातील असून, ते समाजप्रिय व कायदेपालक आहेत.

३२. वादी यांनी कायद्याच्या प्रक्रियेला डावलून आणि प्रतिवादींचे हक्क व अधिकार धाब्यावर बसवून एक तथाकथित "वाटपपत्र" तयार केले आहे. हे वाटपपत्र प्रतिवादींच्या संमतीशिवाय, त्यांना माहिती न देता अंधारात ठेवून केले गेले आहे. त्यामुळे वादींनी कायद्याचा गैरवापर केला असून प्रतिवादींची बहुमुल्य दावा मिळकत हडप करत आहे. वादी हे त्या मिळकतीच्या ससेवाडी गावी वास्तव्यास नाहीत, तरीही त्यांनी नोंदणीकृत वाटपपत्राच्या आधारे मिळकतीच्या सरकारी दप्तरी नाव नोंदवले आहे. त्याचा गैरफायदा घेत वादी ही मिळकत इतर तिऱ्हाईत इसमांना कधीही विकू शकतात किंवा विकसित करून मोठा नफा मिळवू शकतात.

३३. या कारणांमुळे प्रतिवादींना भीती आहे की वादी हे त्यांचे आर्थिक

नुकसान घडवून आणू शकतात. जर मालमत्ता विकली गेली किंवा तिच्या मालकीहक्कात काही बदल झाला, तर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांना वाटपपत्र नोंदविण्याविषयी कोणतीही माहिती देण्यात आलेली नव्हती. प्रतिवादींना फक्त सही करता येते. लिहिता अगर वाचता येत नाही. दि.२३/०५/२००५ रोजी प्रतिवादी क्र.१ यांच्या मुलीचे लग्न होते. त्यानिमित्ताने त्यामुळे प्रतिवादींची वाटपपत्रास मुक्त संमती असण्याचा प्रश्नच येत नाही.

**३४.** दावा मिळकत प्रतिवादींच्या आज देखील त्यांच्या ताब्यात असून, त्यांच्याकडे त्या मालमत्तेचे कायदेशीर हक्क, अधिकार व कब्जा आहे, आणि हे हक्क कायदेशीर आणि शाबीत आहेत. वादींनी या मालमत्तेसंदर्भात कपटाने, अस्तित्वहीन आणि कोणताही कायदेशीर अधिकार नसताना एक बनावट वाटपपत्र तयार करून त्याची नोंद केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिवादींचा प्रतिदावा प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. मालमत्तेवर प्रतिवादींचाच ताबा असल्याने, न्यायाचा तराजू देखील त्यांच्या बाजूने झुकलेला आहे. वादींनी त्रयस्त इसमाचे हक्क प्रस्थापित केल्यास व त्यामुळे क्लिष्टता निर्माण झाल्यास प्रतिवादीचे पैशात कधीही न भरुन येणार नुकसान होणार आहे. सबब, प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणत्याही हस्तकांकरवी हिल्ला हरकत करु नये असा आदेश द्यावा अशी विनंती केली आहे.

**३५.** वादीने सदर अर्जाला कोणतेही म्हणणे/ जबाब दिलेला नाही. तसेच युक्तिवाद केलेला नाही. सबब, नि.२३चा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला आहे.

**३६.** वादीतर्फे नि.५च्या अर्जाकरीता दि.१३/०२/२०२४ रोजी नि.क्रं. ०३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १ | मौजे ससेवाडी येथील गट नं. २५५ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| २ | मौजे ससेवाडी येथील गट नं. २९२ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ३ | मौजे ससेवाडी येथील गट नं. ४०१ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ४ | मौजे ससेवाडी येथील गट नं. ४०२ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ५ | मौजे ससेवाडी येथील गट नं. ४१६ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ६ | मौजे ससेवाडी येथील गट नं. ४२५ चा ७/१२ उतारा | ३०/०१/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ७ | मौजे ससेवाडी येथील गट नं. २६८ चा ७/१२ उतारा | ०५/१२/२०२४ | डिजीटल सही प्रत |
| ८ | रजि.क्र.९२९/२००५ च्या वाटप पत्राची प्रत | २५/०५/२००५ | सही शिक्का प्रत |
| ९ | रजि.क्र. १५९६/२०१५ गाव मौजे ससेवाडी येथील गट नं. २६८ बाबतच्या खरेदी खताच्या सूची क्रमांक २ ची प्रत | २०/१२/२०२३ | सही शिक्का प्रत |
| १० | दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.४ यांनी बांधकाम करत असल्याबाबतचे ३ फोटो | २५/०१/२०२४ | डिजीटल प्रत |

**३७.** प्रतिवादीतर्फे नि.५ व नि.२३ करिता दि.१४/०६/२०२४ रोजी नि.क्रं. २५ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १ | उप अधीक्षक भुमीलेख भोर यांच्याकडल गट क्र.२५५ | २८/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| २ | महाभुमी या संकेतस्थळावरुन गट क्र.२५५ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ३ | उप अधिक्षक भुमी भोर यांच्याकडील गट क्र.२९२ चा गट नकाशा | २८/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ४ | महाभुमी या संकेतस्थळावरुन गट क्र.२९२चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ५ | उप अधीक्षक भुमी भोर यांच्याकडील गट क्र.४०१ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ६ | महाभूमी या संकेतस्थळावरुन गट क्र.४०१ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ७ | महाभूमी या संकेतस्थळावरुन गट क्र.४०२ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | उप अधीक्षक भूमी भोर यांच्याकडील गट क्र.४१६ चा गट नकाशा | २८/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ९ | महाभूमी या संकेतस्थळावरुन गट क्र. ४१६ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १० | उप अधीक्षक भोर यांच्याकडील गट क्र. ४२५ चा गट नकाशा | २८/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| ११ | महाभूमी या संकेतस्थळावरुन गट क्र. ४२५ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १२ | महाभूमी या संकेतस्थळावरुन गट क्र.२६८ चा काढलेला नकाशाचा अहवाल | १४/०६/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १३ | गोपाळ गोविंद वाडकर आणि रखमाबाई शिवराम वाडकर यांच्यामधील बक्षिसपत्र | ०७/०९/१९६४ | सही शिक्का प्रत |
| १४ | गाव मौजे ससेवाडी येथील फेरफार क्र.६०८ | २०/०४/१९७५ | सही शिक्का प्रत |
| १५ | ग्रामपंचायत कार्यालय ससेवाडी यांनी दिलेला ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा उतारा | १४/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १६ | शंकर गोपाळ वाडकर यांच्या नावाचे वीज बील | १६/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | ग्रामपंचायत कार्यालय ससेवाडी यांनी दिलेला कर भरणा पावती क्र.६० | १५/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १८ | ग्रामपंचायत कार्यालय ससेवाडी यांनी दिलेला कर भरणा पावती क्र.९६ | १५/०३/२०२४ | सही शिक्का प्रत |
| १९ | ग्रामपंचायत कार्यालय ससेवाडी यांच्याकडे दिलेला घर बांधणी परवानगी अर्ज | ०२/०२/२०२४ | डिजीटल फोटो |
| २० | शंकर गोपाळ वाडकर यांचे जुने घर दाखविणार रंगीत २ छायाचित्र | | डिजीटल फोटो |

३८. वादीच्या वकीलांनी नि.५ साठी युक्तिवाद तोंडी न केल्याने त्याचा अर्ज हाच युक्तिवाद समजण्यात येतो. तर प्रतिवादी क्र.१,२ व ४ यांच्या विधीज्ञांचा नि.५ व नि.२३ करिता तोंडी युक्तिवाद ऐकण्यात आला आहे. इतर प्रतिवादीविरुध्द वादीने हजर ठेवण्याची पावले उचलेली नाहीत सबब, सदर अर्ज केवळ प्रतिवादी क्र.१, २ व ४ पुरता विचारात घेण्यात आला आहे. वादीचे व प्रतिवादींचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ नि.५ व २३ करीता उपस्थित होतात.

**नि.५ करिता –**

३९. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशतः होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | अंशतः होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**नि.२३ करिता –**

**४०.** सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादींच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल प्रतिवादींच्या बाजूने आहे ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | अंशतः होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## का र ण मि मां सा

## नि.५ करिता

**प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–**

**४१.** वादी प्रस्तुत अर्जाकामी तुर्त मनाई आदेश मिळविण्यासाठी प्रथमदर्शनी दावा मिळकतीसंदर्भाने त्यांचा हक्क शाबित करतात का हे पाहणे महत्वाचे आहे. वादी कथन करतात की, वादी व प्रतिवादी एकत्र हिंदू कुटुंबातील सदस्य आहेत. दावा मिळकत या ही एकत्र कुटुंबाच्या मालकी वहिवाटीच्या आहेत. वादीने अर्जात विस्तृतपणे वंशवेल कथन केलेली आहे. प्रतिवादी हे वादी सोबतचे नातेसंबंध संपूर्णतः नाकारतात.

अशा परिस्थितीत वादीने त्याची भिस्त दावा मिळकत ७/१२ उताऱ्यावर व वाटणीपत्र दस्त क्र.९२९/२००५ वर ठेवली आहे. जरी वादी याक्षणी ते वाटणीपत्र बंधकारक नाही असा दावा घेवून आले असले तरी तो बंधनकारक आहे अथवा नाही हा पुराव्याचा भाग राहील. सध्यास्थितीत सदर वाटणीदस्त नोंदणीकृत असल्याने त्याचे अवलोकन करणे शक्य आहे.

**४२.** सदर वाटणीपत्रक पाहिले असता त्यामध्ये वादी क्र.१ व २ व प्रतिवादी क्र.१, २, ३, ४ ब) यांची नावे व सह्या आहेत. त्यावरुन वादी कथन करतात त्यानुसार या वादीचा व प्रतिवादीचा नातेसंबंध दिसून येतो. तसेच सदर वाटणीपत्रकात दावा मिळकत 'ए' ते 'एफ' चा समावेशही आहे. ज्यात पूर्वेचा भाग प्रतिवादींना तर पश्चिमेचा भाग वादींना दिल्याचे नमूद आहे. <u>यावरुन दावा मिळकत एकत्र कुटुंबाची वडिलार्जित असल्याचे दिसते.</u> अशा वाटणीपत्रकानुसार वादी व प्रतिवादी दोघेही दावा मिळकत 'ए' ते 'एफ' ताबेदार दिसतात. वादीने दावा मिळकत संदर्भाने प्रथमदर्शनी हक्क दर्शविला आहे. <u>परंतु दावा मिळकत 'जी' गट नं.२६८ आहे व वादीच्या कथनानुसार एकत्र कुटुंबाची आहे हे दर्शविणारा दस्त नाही.</u> त्याचप्रमाणे वादीने अर्जात केलेले कथन की, गट नं.२६८ या मिळकतीची प्रतिवादी क्र.१ ते ५, ६, ८ व १३ यांनी प्रतिवादी क्र.१७ ला विक्री केली हे दर्शविण्यासाठी खरेदीदस्त दाखल नाही. <u>तसेच गट नं. २६८ ( जी मिळकत ) च्या ७/१२ उताऱ्यावर वादी व प्रतिवादींची नावे दिसत नाहीत. सबब, 'जी' मिळकत संदर्भात वादी हक्क शाबित करु शकले नाहीत.</u>

**४३.** वादीचे पुढे असे कथन आहे दावा मिळकत गट क्र.४२५ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ वादीच्या जागेत बेकायदेशीर बांधकाम करीत आहेत परंतु वर कथन केल्यानुसार दावा मिळकतमध्ये वादी प्रतिवादींची वाटणीपत्रानुसार वहिवाट ताबा आहे तसेच बांधकामबाबतचे कथन प्रतिवादी मान्य करतात. परंतु प्रतिवादी वादीच्या क्षेत्रात बेकायदेशीर बांधकाम नेमके कोठे करत आहेत याविषयी व क्षेत्राविषयी वादी नमूद करीत

नाही. अशापरिस्थितीत याक्षणी बांधकाम बेकायदेशीर ठरविणे शक्य नाही.

**४४.** वादीने प्रतिवादी दावा मिळकती विक्रीच्या प्रयत्नात आहेत असे कथन केले आहे, प्रतिवादी ते नाकारतात. त्यामुळे वादी त्याची भिस्त गट क्र.४२५ संदर्भाने झालेला फेरफार क्र.१२५२ वर ठेवत आहे. ज्यामध्ये प्रतिवादी ५, ७, ८ व १३ यांनी त्याचा अविभाज्य हिस्सा विकल्याचे दिसते. परंतु सदर प्रतिवादींना दाव्यात हजर करण्यासाठी वादीने पावले उचलेली नाही. सबब, हजर प्रतिवादी विक्रीचा प्रयत्न करत आहेत असे दर्शविणारा दस्त नाही. असे असले तरी प्रस्तुत दाव्यात वाटप, ठराव, ताबा, मनाई यासारख्या मागण्या वादीने मागितल्या आहेत. दावा मिळकत 'ए' ते 'एफ' संदर्भाने हक्क प्रथमदर्शनी दाखविला आहे. त्यामुळे त्या मिळकतीचे स्वरुप बदलणार नाही, तसेच त्रयस्थ हक्क निर्माण होवून गुंतागुंत वाढेल यासाठी प्रथमदर्शनी वादीने त्यांची केस अंशतः शाबित केली आहे. सबब, प्रश्नबिंदू क्र.१ वादीच्या हक्कात अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**४५.** **<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –** वादीने दावा मिळकत 'ए ते एफ' संदर्भाने त्यांचा हक्क दर्शविला असल्याने तो संरक्षित होणे गरजेचे आहे. दाव्याचा अंतिम निकाल पावेतो जर त्यात त्रयस्थ हक्क निर्माण झाले तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने त्रयस्थ इसम हक्क/ व्यवहार होवू नयेत एवढ्या पुरता झुकलेला आहे त्यामुळे प्रश्नबिंदू क्र.२ व ३ वादीच्या हक्कात अशंतः होकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –** वादीने प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ अंशतः शाबित केले आहे. दावा मिळकत २६८ संदर्भाने कोणताही हक्क शाबित नाही तसेच कायदेशीर बांधकामही प्रथमदर्शनी शाबित नाही. सबब ते वगळता इतर मागणी व दावा मिळकत संदर्भाने पुढील आदेश पारित करण्यात येत आहेत.

## <u>का र ण मि मां सा</u>

## <u>नि.२३ करिता</u>

४६. **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–</u>**

प्रतिवादी तुर्त मनाई आदेश त्याचा दावा मिळकतीवरील ताबा संरक्षित व्हावा त्यात त्रयस्थ हक्क निर्माण केले जावू नयेत व बांधकाम कोणत्याही स्वरुपाचे वादी अथवा हस्ताकांकरवी करु नये यासाठी केला आहे. या मागणी मान्य करण्यासाठी प्रतिवादी त्यांचा प्रथमदर्शनी हक्क शाबित करतात का ? हे पाहणे महत्वाचे आहे. म्हणजेच दावा मिळकतीचा ताबा हा केवळ प्रतिवादींचा आहे का ? वा त्यात त्रयस्थ हक्क निर्माण करु पाहत आहेत किंवा बांधकाम करीत आहेत असे प्रतिवादी प्रथमदर्शनी दाखवतात का हे पाहणे गरजेचे आहे.

४७. प्रतिवादीचे कथन आहे की, वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादी हे प्रतिवादीचे कोणतेही नातेवाईक नाहीत. प्रतिवादीचे कथन आहे की, दावा मिळकत गट क्र.२५५, ४०२, २९२ या प्रतिवादीला रखमाबाई वाडकर यांच्याकडून बक्षीसपत्राने प्राप्त आहेत ते बक्षिसपत्र नोंदणीकृत आहे. सबब, त्या मिळकती वडिलार्जित नाहीत. सदरचे बक्षिसपत्र प्रत प्रतिवादीने दाखल केलेली आहे. कथनानुसार प्रतिवादीला बक्षिसपत्राने मिळकत आल्याचे दिसते. सदर बक्षिसपत्र प्रतिवादीचे पूर्वज गोपाळ यांना आल्या आहेत. परंतु त्यानंतरच्या २००५ च्या वाटणीपत्रात याच मिळकतीची वाटणी झाल्याचे दिसते. मग वाटणीपत्रावेळी प्रतिवादींनी बक्षिसपत्राने मिळालेल्या कथित मिळकती समाविष्ठ केल्याबद्दल हरकत घेतल्याचे दिसत नाही.

४८. तसेच अर्जात हेच प्रतिवादींसोबत झालेल्या वाटणीपत्रकचा नोंदणीकृत दस्त अस्तित्व मान्य करतात. सदर दस्त आज आव्हानित दोन्ही पक्षकारांनी वेगवेगळया कारणास्तव केला असला तरी सदरचा दस्त हा २००५ सालचा म्हणजेच १९ वर्ष जुना

आहे तसेच नोंदणीकृत आहे व आजपावेतो रद्दबातल नाही. तसेच त्या दस्तावरुन अवलोकन करुन मी नमूद परिच्छेद क्र.३६ मध्ये उहापोह कारणमिमांसा देवून वादी व प्रतिवादी यातील नातेसंबंध व दावा मिळकत गट क्र.२५५, २९२, ४०१, ४०२, ४१६, ४२५ साठी वडिलार्जित असल्याचे नमूद केले आहे. सबब, प्रतिवादींचा वादीशी नातेसंबंध आहे. एवढेच नव्हेतर वर नमूद मिळकतीचे वादी व प्रतिवादींमध्ये वाटप त्यामध्ये नमूद आहे अशा परिस्थितीत सदर दावा मिळकतीसाठी या प्रतिवादीचा एकमेव ताबा आहे असे म्हणता येणार नाही.

**४९.** प्रतिवादींची दुसरी मागणी आहे की, वादी अथवा हस्तकाकरवी दावा मिळकतीत अर्धे, कच्चे, पक्के, पुर्ण कसलेही बांधकाम करु नये येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, संपूर्ण अर्जात वादी दावा मिळकतीत बेकायदेशीर बांधकाम करीत आहे असे अवाक्षरही प्रतिवादींनी नोंदविलेले नाही. तसेच वर नमूद केल्यानुसार दावा मिळकत वाटपपत्रानुसार प्रतिवादी व वादीचा ताबा वहिवाट नमूद आहे. त्यामुळे दोघांनाही वहिवाट एकमेकांची अडविण्याचा अधिकार नाही.सबब, बांधकाम संदर्भातील तुर्त मनाई मागणी मान्य करणे शक्य नाही.

**५०.** प्रतिवादींची तिसरी मागणी की, वादीने दावा मिळकत वाटणीपत्राच्या जोरावर त्रयस्थ हक्क निर्माण करु नयेत. या मागणीसाठी प्रतिवादीला प्रथम हे दर्शविणे गरजेचे आहे वादी तसे हक्क निर्माण करीत आहे. त्या सदंर्भाने प्रतिवादीने कोणताही पुरावा, जाहीर नोटीस अथवा नेमकी घटना विशद केलेली नाही. असे करतानाही वादीचा मुळ दावा हा वाटप, ठराव व मनाई तर प्रतिदावा हा ठराव व मनाईसाठी आहे. दोन्ही पक्षकार वाटपपत्र स्वतःच्या स्वतंत्र करण्यासाठी नाकारित आहेत. अशा परिस्थितीत दाव्याची गुंतागुंत वाढू नये यासाठी जसे नि.५ च्या कारणमिमांसेत प्रतिवादींवर बंधन घालण्यात आले आहे की, त्यांनी त्रयस्थ हक्क निर्माण करु नये तीच कारणमिमांसा वादीवर ही लागू ठरते. सबब, त्या पुरती मागणी या प्रतिवादीची स्विकारण्यात येत आहे.

**५१.** वरील कारणमिमांसेनुसार नि.२३च्या अर्जातील केवळ त्रयस्थ हक्क निर्माण करण्यात येवू नयेत ही मागणी वादीच्या विरोधात स्विकारण्यात येत आहे. सबब, प्रश्नबिंदू क्र.१ प्रतिवादींच्या हक्कात अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**५२. <u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –** प्रतिवादींनी दावा मिळकत 'ए ते एफ' संदर्भाने त्यांचा हक्क दर्शविला असल्याने तो संरक्षित होणे गरजेचे आहे. दाव्याचा अंतिम निकाल पावेतो जर त्यात त्रयस्थ हक्क निर्माण झाले तर प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने त्रयस्थ इसम हक्क/ व्यवहार होवू नयेत एवढ्या पुरता झुकलेला आहे त्यामुळे प्रश्नबिंदू क्र.२ व ३ प्रतिवादींच्या हक्कात अशंतः होकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –** वादी व प्रतिवादीने प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ अंशतः शाबित केले आहे. दावा मिळकत २६८ संदर्भाने कोणताही हक्क शाबित नाही तसेच कायदेशीर बांधकामही प्रथमदर्शनी शाबित नाही. सबब ते वगळता इतर मागणी व दावा मिळकत संदर्भाने पुढील आदेश पारित करण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. वादीचा नि.५ व प्रतिवादींचा नि.२३ चा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी दावा मिळकत गट क्र.२५५, २९२, ४०१, ४०२, ४१६ व ४२५ संदर्भाने त्रयस्थ हक्क निर्माण करु नये.

३. वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकत गट क्र.२५५, २९२, ४०१, ४०२, ४१६ व ४२५ चे स्वरुप बदलू नये.

४. गट क्र.२६८ बाबत आदेश नाही.

५. तसेच गट क्र.४२५ च्या बांधकाम स्थगितीबाबत आदेश नाही.

६. अर्जाचा खर्च अंतिम निर्णयात विचारात घेतला जाईल.

**( नेहा के.नागरगोजे )**

**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**भोर, जि.पुणे**

**दि. १८/११/२०२४**